# कंदोरी करणाऱ्यांना लुटणाऱ्या १२ आरोपींना अटक

सत्यप्रभा दि 23/07/2023

## सव्वा लाख रुपये, शस्त्रे, दुचाकींसह सहा लाखांचा ऐवज जप्त



**नांदेड, दि. २२ :** किनवट येथे दोन कार घेऊन शस्त्रासह आलेल्या चोरट्यांनी कंदोरी करत असलेल्या ठिकाणांवर धाड टाकत पिस्तुलातून एक फैरी झाडून लाखोंचा ऐवज लंपास केला होता. या प्रकरणातील १२ आरोपींना अटक करुन रोख १ लाख २५ हजार आणि गुन्ह्यात वापरलेल्या ८ दुचाकी, २ शस्त्र असा ५ लाख ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे

किनवट ते माहूर राष्ट्रीय महामार्गाच्या पूर्वेला एका शेतात १८ जुलै रोजी सायंकाळी साडेपाच ते सहाच्या सुमारास कंदोरीचा कार्यक्रम सुरु होता. त्यावेळी दहा ते बारा शस्त्रधारी चोरटे तेथे आले. प्रथम त्यांनी पिस्तुलातून एक राऊंड झाडला आणि उपस्थितांचे मोबाइल हस्तगत केले. एक रुमाल खाली टाकून त्यामध्ये पैसे, दागिने जमा करण्यास सांगितले. अंगावरचे सोनेही काढून घेतले. त्यानंतर चोरट्यांनी उपस्थित सर्वांना एका खोलीत डांबून तेथून पळ काढला. या घटनेत १ लाख २५ हजार रुपयांची रक्कम लंपास केली होती. याप्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने शोध मोहीम राबवत वैभव शिवराम गुरव, अंशुमनसिंघ राजेंद्रसिंघ मीलवाले, मुकेश उर्फ एमजेपी चंदन जोगदंड, प्रशीक उर्फ परशा उर्फ रॉणी दिलीप ओढणे, चंद्रशेखर उर्फ चंदू देवराव पाईकराव, ज्ञानेश्वर उर्फ डॅनी अनिरुद्ध गाडगे,

>> पान दोनवर